# तळेगाव दाभाडे नगरपरिषद

तळेगाव दाभाडे , ता. मावळ , जि. पुणे

दूरध्वनी क्र : १८००-२३३-२७३४

ई-मेल : talegaondabhademc@gmail.com

संकेतस्थळ : www.talegaondabhademc.org


## पाणीपुरवठा विभाग

## (निविदा अटी व शर्ती)

**कामाचे नाव** - तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागास मनुष्यबळ वार्षिक निविदा पद्धतीने पुरविणे वार्षिक निविदा पद्धतीने.

**निविदा सादर करण्याचा प्रकार**:- दोन लिफाफा पध्दतीने निविदा सादर कराव्यात.

- (लिफाफा क्र ०१ — तांत्रिक लिफाफा)
- (लिफाफा क्र ०२ — आर्थिक लिफाफा)

- **अंदाजपत्रकीय रक्कम** — र.रु. १४,११,६७४/- रूपये
- **निविदा प्रपत्र फी** — र.रु.१०००/- रूपये
- **निविदा बयाणा रक्कम** — र.रु. १४,११७/-रूपये

- **कंत्राटदाराने सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. निविदा शुल्क व अनामत रक्कम भरल्याची पावती.

२. संस्था/एजन्सीचे/कंत्राटदार यांचे PWD / MJP यांचेकडील शासकीय नोंदणी प्रमाणपत्र/शॉप ॲक्ट प्रमाणपत्र.

३. पॅनकार्ड ची साक्षांकित प्रत.

४. G.S.T नोंदणी प्रमाणपत्र

५. ESIC नोंदणी प्रमाणपत्र

६. EPF नोंदणी प्रमाणपत्र

७. मागील ३ वर्षाचे आयकर भरणा केल्याबाबतचे विवरणपत्र.

८. कोणतेही नगरसेवक अथवा नगराध्यक्ष यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या कंत्राटमध्ये सहभाग नसल्याचे प्रमाणपत्र ५००/- स्टॅम्प पेपरवर.

९. कंत्राटदार कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय संस्थांमध्ये Black listed झालेला नसावा त्याबाबतचे स्वयंघोषना प्रमाणपत्र. (५००/- स्टॅम्पवर)

१०. निविदा सोबत सादर केलेल्या कागदपत्र खरे असल्या बाबतचे ५००/- स्टॅम्प पेपरवर affidavit सादर करणे अनिवार्य आहे.

११. सदर कामाच्या अनुषंगाने संपूर्ण शहराची पाहणी केलेबाबतचा स्थळ पाहणी दाखला.

**टीप :- लिफाफा क्र. १ मध्ये अनावश्यक कागदपत्रे सादर करू नयेत तसेच लिफाफा क्र. १ मध्ये जोडलेल्या प्रत्येक कागदपत्रांवर त्या कागदाचा तपशील नोंदवावा.**

- **लिफाफा क्र.२ :-**

१) BOQ (bill of quantity)

२) लिफाफा क्र.०१ उघडून त्यामधील कागद पत्राची तपासणी करून वरील प्रमाणे अटी व शर्ती नुसार आवश्यक कागदपत्रे असल्याची खात्री झाल्यानंतरच लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल अन्यथा त्या निविदेचा विचार केल्या जाणार नाही. यात काही वाद निर्माण झाल्यास अंतिम निर्णय मुख्याधिकारी तळेगाव दाभाडे नगरपरिषद यांचा राहील.

- **सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

- याकामी नियमाप्रमाणे होणारा आयकर व शासकीय कर बिलातुन कपात करावा लागणार आहे.
- या कामी महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती अधिनियम १९६५ व महाराष्ट्र नगरपालिका किंवा संहिता १९७१ पब्लिक मॅन्युअल वर्क्स यांचे बंधन लिहुन देणार यांचेवर राहिल.
- करारनामा करताना २ टक्के सूरक्षा अनामत रक्कम मंजुर निविदाधारकास भरावी लागेल.
- सदर कपात केलेली सुरक्षा अनामत विना व्याज ठेवण्यात येऊन निविदेचा कालावधी पुर्ण झाले नंतर रक्कम अदा करण्यात येईल.
- योग्य त्या स्टँम्प पेपरवर आपणांस करारनामा करुन द्यावा लागेल.
- टेंडर स्वीकारणे / नाकारणे अथवा फेरबदलाचे सर्व अधिकार नगरपरिषदेकडे राहतील.

- मक्तेदाराच्या कामामध्ये वाद उदभवल्यास याबाबत मा.मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
- करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा ठेकेदाराने भंग केल्यास बयाणा/अनामत रक्कम जप्त करुन पुर्व नोटीस देऊन रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांचेकडे राहील.
- नगरपरिषदेने दिलेल्या नमुन्याप्रमाणे परिशिष्ट 'अ' निविदा धारकांनी नगरपरिषदेस सादर करावा.
- मंजुर निविदाकार यांनी दिलेल्या कामात दिरंगाई / चाल ढकल केल्यास निविदाकाराच्या बयाणा रक्कम न.पा. फंडात जमा करण्यात येउन दंडनीय कार्यावाही करण्यात येईल.
- निविदा काराने केलेल्या कामाचे चाचणी नगरपरिषद अभियंता\ तथा पाणीपुरवठा अभियंता यांचे समक्ष करावयाचे असून केलेल्या कामाचा दाखला नगरपरिषदेस देणे ठेकेदारास बंधण कारक राहील.
- अटीयुक्त निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.
- मंजुर केलेले दर निविदाधारकावर बंधनकारक राहतील. निविदा मंजुर झाल्यानंतर जर काही लेबर दरात /साहित्याच्या दरात वाढ झाली तर निविदा दरामध्ये कोणतीही दर वाढ केली जाणार नाही. हया निवेदेचे सर्व अटी व शर्ती मला मान्य असून मी योग्य ती सर्व माहीती घेऊनच मी हे निविदा पत्रक भरले आहे.
- निविदा मंजुर झाल्यास नगरपरिषदेच्या मागणीप्रमाणे मनुष्यबळाचा पुरवठा कंत्राटदारास करावा लागेल.
- सदर कामाची मुदत ही कार्यादेश दिल्यापासून १ वर्ष राहील .
- नगरपरिषदेने सांगितलेल्या ठिकाणी साहित्य व त्या अनुषंगाने येणारी कामे करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.
- कार्यादेश मिळाल्यापासून १ दिवसाच्या आत साहित्य पुरवठा करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहिल.
- पुरविलेल्या साहित्याबाबत व कामाबाबत काही दोष वा तक्रार आढळल्यास त्यास पूर्णत: जबाबदार निविदाधारक असेल.

- काम पार पाडत असताना नियुक्त कामगाराचा अपघात झाल्यास त्याची सर्व जबाबदारी मक्तेदाराची राहील.
- कामागारांमध्ये वाद उद्भवल्यास त्यांची सर्व जबाबदारी मक्तेदाराची राहील.
- सदर कामाविषयी महाराष्ट्र शासनाची फी तसेच सर्व प्रकारचे टॅक्सेस भरण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.
- सदर कामाचे अंदाजपत्रकानुसार मंजूर दराप्रमाणेच कामगारांना वेतन देणे बंधनकारक राहील.
- ठेकेदाराचे कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन, बेकायदेशीर वागणूक निदर्शनास असल्यास अशा कर्मचाऱ्यास मक्तेदाराने कामावरून कमी केले पाहिजे.
- निश्चित केलेल्या कर्मचारी संख्येपेक्षा कमी कर्मचारी हजर असल्यास प्रती गैरहजर कामगार प्रतिदिन र.रु. ७००/- प्रमाणे मक्तेदाराचे बिलातून कपात केली जाईल.
- मा.मुख्याधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या संबंधित अधिकारी यांच्या सुचनांचे पालन करणे मक्तेदारावर बंधनकारक राहिल.
- करारनाम्यातील कोणत्याही अटी व शर्तीचा माझ्यामार्फत भंग झाल्यास निविदा बयाणा रक्कम जप्त करून पुर्व नोटीस देवुन निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांचेकडे राहिल.
- निविदेत भरलेल्या दराशिवाय इतर कोणत्याही रकमेची मागणी करण्याचा अधिकार मक्तेदारावर राहणार नाही.
- नगरपरिषदेच्या अटी व शर्तीनुसार कामे करण्यात येईल. अटी व शर्ती बदलाबाबत अंतिम निर्णय मा.मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

**देयकाचे प्रदाणाबाबत :-**

१. सदर कामासाठी नगरपरिषद निधीतून योग्य ते नियोजन करून मक्तेदाराचे बिल अदा केले जाईल.

२. निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे नगरपरिषदेकडून मक्तेदारास बिल देण्यास अडचण निर्माण झाल्यास मक्तेदाराने किमान तीन महिने कर्मचाऱ्यांना सर्व लाभासह मोबदला देणे बंधनकारक राहील.

३. देयकासोबत कामावर नियुक्त असलेल्या कामगारांचे EPF, ESIC चे चलन, वेतन अदा केलेबाबतचे बँक स्टेटमेंट, वेतन पत्रक व केलेल्या कामाचे GPS फोटो सोबत जोडणे अनिवार्य राहील. त्याशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

४. नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता देयकाचे शोधन करण्यास विलंब होईल. अशा विलंबासाठी कंत्राटदाराला व्याजासह देयकांची मागणी करता येणार नाही.

५. कामावर अनुज्ञेय असलेले आयकर, GST, लेबर वेल्फेअरसेस, EPF कपात करण्याचे तसेच शासनाकडून वेळोवेळी आकारण्यात येणारा कर कपात करण्याचे अधिकार नगरपरिषदेला राहील.

६. मक्तेदारास कुठलीही भाववाढ मिळणार नाही.

७. मक्तेदाराच्या बिलातून सर्व शासकीय वाजवटी करण्यात येतील.

८. नमूद कामाबाबत मक्तेदारास एखादे करातून शासन नियमानुसार सवलत असल्यास त्याबाबतचे स्वतंत्र पत्र मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद या नावाने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील त्याशिवाय अशी सवलत मिळणार नाही.

९. नमूद कामातील लेखापरीक्षण आक्षेपाची पूर्तता करून देण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

१०. मुख्याधिकारी यांना मक्तेदारावर कुठल्याही नवीन अटी शर्ती बंधनकारक करण्यचा अधिकार राहील.

११. मक्तेदाराचे संपूर्ण कामावर मुख्याधिकारी, अभियंता, स्वच्छता निरीक्षक व नगरपरिषदेचे निर्धारित केलेले अधिकारी देखरेख व नियंत्रण ठेवतील.

- **अनामत व सुरक्षा ठेव रक्कम** :-

१. कंत्राटदारास काम समाधानकारकरित्या संपल्यानंतर व सदर कामाचे स्थानिक निधी लेखापरीक्षक यांच्यातर्फे लेखापरीक्षण झालेनंतर सदर अहवालास अधीन राहून सुरक्षा ठेव रक्कम (एकून १०%) परत करण्यात येईल.

**२.** ज्या निविदा धारकाची निविदा अमान्य झालेली आहे त्यांची अनामत रक्कम कामाचा कार्यादेश दिल्यानंतर परत करण्यात येईल.

**३.** करारातील अटी व शर्ती नुसार कंत्राटदाराने काम पूर्ण केले असल्यास व कंत्राटदाराकडून त्यांनी केलेल्या कामाबाबत कोणतीही रक्कम नगरपरिषदेकडे येणे नसल्यास तसेच लेखा परीक्षनांमध्ये कंत्राटदाराकडून निघालेली वसूल पात्र रक्कम वसूल करून उर्वरित सुरक्षा अनामत रक्कम परत करण्यात येईल.

**४.** नमूद कामाचे लेखापरीक्षण आक्षेपामध्ये काही रक्कम वसूल पात्र निघाल्यास व सदर आक्षेप पूर्तता करून देण्यास मक्तेदाराने प्रतिसाद न दिल्यास नमूद आक्षपातील वसूल पात्र रक्कम मक्तेदाराच्या सुरक्षा रकमेतून कपात केली जाईल.

- **<u>निधी / वित्तीय बाबी :-</u>**

१. सदर कामासाठी नगरपरिषद निधीतून योग्य ते नियोजन करून मक्तेदाराचे बिल अदा केले जाईल.

२. निधी वेळेवर उपलब्ध न झाल्यास मक्तेदाराने कर्मचाऱ्यांना सर्व लाभासह मोबदला देणे बंधनकारक राहील.

३. मक्तेदारस कुठलीही भाववाढ मिळणार नाही.

४. मक्तेदाराच्या मासिक बिलातून सर्व शासकीय वाजवटी करण्यात येतील.

५. नमूद कामाबाबत मक्तेदारास एखादे करातून शासन नियमानुसार सवलत असल्यास त्याबाबतचे स्वतंत्र पत्र मुख्याधिकारी, तळेगाव दाभाडे नगरपरिषद या नावाने उपलब्ध करून देण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील त्याशिवाय अशी सवलत मिळणार नाही.

६. नमूद कामातील लेखापरीक्षण आक्षेपाची पूर्तता करून देण्याची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

७. मुख्याधिकारी यांना मक्तेदारावर कुठल्याही नवीन अटी शर्ती बंधनकारक करण्यचा अधिकार राहील.

**APPENDIX-1**

Format of affidavit to be given on Rs. 500/- Non-Judicial stamp paper to be sworn before Executive Magistrate/Notary Public.)

Affidavit

I, ______________________________________ (Name of Contractor/person,)Agedabout ______ years, residing at ____________________________________________________(Postal Address) do hereby swear this affidavit that I am the proprietor / Partner of (Name of company / firm) Registered at ___________

I do hereby swear that, the documents submitted in envelope No. 1 of the tender document for the work of-------- **Work Name** --------- are true, correct and complete. In case the contents of envelope No. 1 and other documents pertaining to the tender submitted by me are found to be incorrect or false, I shall be liable for action under the relevant provision of Indian Penal Code and other relevant laws.

Applicant/Contractor Name:-
Address:-
Signature of Applicant/contractor:-
Date:-

Name of witnesse:-
Address:-
Signature of witnesse:-
Date:-

**APPENDIX-2**

**AFFIDAVIT**

**( NOT BLACKLISTED )**

I …………………………( Name of contractor / Authorized person ) Aged about …… years, Residing at……………………………………….. do swear this affidavit that I am proprietor / partner of ………………………… ( name of company / firm ) Registered at …………………………………We hereby confirm and declared that we / I ………………………………….. ( name of contractor / firm ) are not blacklisted in any Govt. / semi govt. / co- operative sector / Corporation Organization for any work .

If it is found to be incorrect or false, I shall be liable for action under the relevant provision of I.P.C. Code and relevant laws.

Name of work :- …………………………………………………………………..

Applicant / Contractor Name :- …………………………………………

Place : ……………………………….

Date : ………………………………..

Email id : ……………………………

Mobile no. :-……………………….

Signature of Authorized person

APPENDIX-३

परिशिष्ट— अ

प्रतिज्ञा पत्र

मी / आम्ही याद्वारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद , नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६ (१) (आय) व कलम ४४ (१) ( ब ) तरतुदीच्या, ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी/नगर पंचायतशी किंवा नगरपालिकेच्या अधीन किंवा नगरपालिकेने/नगर पंचायतने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या/नगर पंचायतेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागेदारी नाही.

कलम १६ (१ ) ( आय) : यापुढे तरतूद केली असेल याव्यतिरिक्त, नगरपालिकेच्या/नगर पंचायतच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधीन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतः चा किंवा आपल्या भागीदारामार्फात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

कलम ४४ ( १ ) ( ब ) : पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या/नगर पंचायतच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणूनम ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोट- कलम ( ३ ) , खंड (अ ) , ( ब ), (क ), ( इ) व ( ग ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्य रीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल. मग अशा हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत

त्याचा अशीलाच्या, प्रकर्त्याचा किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक दृष्ट्या त्याचा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदा धारकाचे नाव : ---------------------------------

पत्ता : ---------------------------------- निविदा धारकाची सही

दिनांक :

साक्षीदाराचे नाव : ---------------------------------

पत्ता : ---------------------------------- साक्षीदाराचे सही

दिनांक :

APPENDIX-४

(परिशिष्ठ -४)

**<u>कंत्राटदाराचे स्थळ पाहणी अहवाल</u>**

प्रमाणित करण्यात येते कि, ........................................................................ (कंत्राटदाराने अधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे नाव) हे मे. ....................................................................... (कंपनी/संस्थेचे नाव) या संस्थेचे अधिकृत प्रतिनिधी असून त्यांनी या कामासाठी स्थळ पाहणी करण्यासाठी प्राधिकृत केलेले असून त्यांनी जागेची पाहणी केलेली आहे.

तरी जागेवर साहित्याची उपलब्धता,साहित्याची ने-आण या सर्व गोष्टी पाहून निविदेमध्ये आम्ही दर सादर करीत आहोत व सदर कामाच्या ठिकाणांचे Geotag फोटो यासोबत सादर करीत आहे. वरील काम आमचेसाठी अनुकूल आहे. सदर निविदेमध्ये आम्हाला काम मिळाल्यास कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत काम सुरु करू याची ग्वाही देत आहे.

मुख्याधिकारी

तळेगाव दाभाडे नगरपरिषद

कंत्राटदाराचे नाव व स्वाक्षरी :-

Signature Not Verified

Digitally signed by ABHISHEK TANAJI SHINDE
Date: 2026.05.15 16:38:28 IST
Location: Maharashtra-MH